मुंबईतील भांडुपच्या *खिंडीपाडा* या आदिवासी वस्तीत लहानाचे मोठे झालेल्या महादेव आणि शिवाजी पिंजारी, प्रशांत जाधव, ललिता काळे, सायली, समीर अत्तार या विद्यार्थ्यांमध्ये एक गोष्ट समान आहे. ती म्हणजे, भांडुपचं *राजारामशेठ विद्यालय.* घरच्या बेताच्या आर्थिक स्थितीमुळे कधीकाळी हे विद्यार्थी शिक्षणाला मुकणार होते. आई-वडील करत असलेल्या मोलमजुरीच्या कामाला जुंपले जाणार होते.

मात्र या विद्यार्थ्यांच्या *करिअरमध्ये राजारामशेठ विद्यालय* या संस्थेची भूमिका महत्त्वाची ठरलीय. शाळेच्या तेव्हाच्या शिक्षिका आणि आताच्या मुख्याध्यापिका रश्मी खानविलकर यांनी आदिवासी पाड्यावरच्या अनेक विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड निर्माण केली. त्यांची जिद्द वाढवली. विद्यार्थी न चुकता, न कंटाळता शाळेत येऊ लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर आपल्या शैक्षणिक प्रगतीच्या बळावर काही उत्तम नोकरदार आणि काही यशस्वी व्यावसायिक म्हणून नावारूपास आले आहेत.

भांडुपच्या खिंडीपाड्यातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचं श्रेय *राजाराम विद्यालयाच्या* मुख्याध्यापिका शिक्षिका रश्मी खानविलकरांना जातं. राज्यात इंग्रजी माध्यमाच्या आणि जागतिक दर्जाच्या शाळा मोठ्या प्रमाणात उभ्या राहात असताना पाड्यावरच्या मराठी शाळेचं महत्त्व अबाधित ठेवण्यासाठी रश्मी खानविलकर यांनी प्रचंड मेहनत घेतली. त्याची पोचपावती म्हणजे त्यांचा *प्रिन्सिपल ऑफ द इयर* या राष्ट्रीय पुरस्काराने ११ डिसेंबर २०१९ रोजी नवी दिल्ली येथे सत्कार करण्यात आला.

या पुरस्कारावर संपूर्ण भारतातून एकमेव मराठी मुख्याध्यापिका

## रश्मी खानविलकर

# शिक्षणज्योती

**आदिवासी पाड्यावरच्या विद्यार्थ्यांना शिक्षित करून मुख्य प्रवाहात आणण्याचं काम मुख्याध्यापिका रश्मी खानविलकर करीत आहेत. त्यासाठी अलीकडेच त्यांचा प्रिन्सिपल ऑफ द इअर या राष्ट्रीय पुरस्काराने गौरव झालाय.**

संध्या नाईक




फोटो : प्रकाश सरमळकर





म्हणून मोहोर उमटवण्यात ४७ वर्षांच्या रश्मी खानविलकर यशस्वी झाल्यात.

रश्मी खानविलकर *चित्रलेखाला* सांगतात, 'गेल्या ३० वर्षांपासून जे काही काम करतेय, त्याचा गौरव म्हणजे हा *प्रिन्सिपल ऑफ द इयर* हा पुरस्कार! प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण पूर्ण करताना किती प्रकारच्या अपमानास्पद गोष्टींना सामोरं जावं लागतं, याचा अनुभव मला आहे. म्हणूनच मी गरिबीमुळे शिक्षण घेऊ न शकणाऱ्या प्रत्येकाला मदत करण्याचं ठरवलं आणि केलंही. मात्र अजून खूप मजल गाठायची आहे.'

**'प्रिन्सिपल ऑफ द इअर' रश्मी खानविलकर : आदिवासी पाड्यावरच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून घडवलं, ते आज स्वबळावर आपापल्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवित आहेत, याचे शिक्षक म्हणून खूप समाधान वाटते.**

लहानपणापासून *शिक्षक* बनण्याची इच्छा असणाऱ्या रश्मी यांना असंख्य अडथळ्यांची शर्यत पार करावी लागली. रश्मी सांगतात, 'कधी शाळेची *फी* भरण्यासाठी पैसे नसायचे; तर कधी अभ्यासाचं साहित्य कसे घ्यावे, याची विवंचना असायची. अभ्यास करताना कधीकधी लाईटही जायची. वडील ज्या खासगी ठिकाणी नोकरी करत होते, ती कंपनी बंद पडली. तेव्हा आमचे भरपूर हाल झाले. मग नोकरी करून शिकण्याची वेळ आली. मात्र कधी परिस्थितीसमोर मान तुकवली नाही. मी ठाण्याच्या न्यू *गर्ल्स स्कूलमधून* शालेय शिक्षण पूर्ण केलं. *यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून* कॉलेजचं शिक्षण पूर्ण केल्यावर मुंबईत चेंबूरच्या *डीएड कॉलेजमध्ये* *ॲडमिशन* घेतलं. ठाण्याच्या *ज्ञानोदय विद्यामंदिरमध्ये* नोकरीही लागली. ती करीत असताना *डीएड* पूर्ण केलं. लग्नानंतर घर, संसार, नोकरी अशी तिहेरी कसरत करीत *बीएड* झाले.'

रश्मी खानविलकर यांचे पती रमेश खानविलकरांना त्यांचे आजोबा राजारामशेठ खानविलकर यांना नावाने एक सामाजिक उपक्रम सुरू करायचा होता. त्या उपक्रमाचा शुभारंभ भांडूपच्या खिंडीपाडा या परिसरात *राजारामशेठ विद्यालयातून* झाला. रश्मी सांगतात, 'शाळेतली नोकरी आणि कॉलेजचं शिक्षण अशी कसरत करताना संसार, कुटुंबाकडे दुर्लक्ष झालं नाही. घरी आल्यावरसुद्धा माझ्यातला शिक्षक स्वस्थ बसत नसे. शेजारपाजारची मुलं त्यांना अभ्यासात काही अडलं, तर माझ्याकडे शंका निरसन करण्यासाठी येत. त्यांना मी काळ-वेळ न बघता मदत करीत असे. माझी ही धडपड माझे पती पाहात असत. त्यांना त्यांच्या आजोबांच्या नावाने उपक्रम सुरू करायचाच होता. त्याची सुरुवात शाळेपासून करण्याची कल्पना त्यांनी माझ्या सासू-सासऱ्यांकडे मांडली. सामाजिक कार्याची आवड असल्याने सासू-सासऱ्यांनीही त्यासाठी परवानगी दिली.'

१९९५ मध्ये भांडुपच्या खिंडीपाडा येथे शाळेची सुरुवात झाली, तेव्हा ती अतिशय छोटी होती. आता मात्र शाळेची मोठी इमारत आहे. रश्मी सांगतात, 'त्या काळात भांडुपच्या खिंडीपाडा या आदिवासी परिसरातील लोकांच्या खिशाला शिक्षण परवडेल अशी शिक्षण संस्था नव्हती. त्यामुळे, *राजारामशेठ विद्यालयासाठी* शाळेचे संचालक रमेश खानविलकर यांनी खिंडीपाडा भागाची निवड केली.'

ही शाळा एका टेकडीवर होती. शाळेला मैदान नव्हतं. केवळ दोन वर्ग खोल्या होत्या. पाड्यावरच्या घराघरांत फिरून शाळेसाठी विद्यार्थी गोळा केले. विद्यार्थ्यांची गळती होऊ नये, यासाठी विद्यार्थ्यांबरोबर त्यांच्या पालकांशी खेळीमेळीचे संबंध ठेवले.

रश्मी खानविलकर सांगतात, 'आमच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक गरीब--कष्टकरी वर्गातले आहेत. यामुळे पालकांवर कधीही पाल्याच्या शैक्षणिक खर्चाचा बोजा पडू दिला नाही. अभ्यासात फारशी गती नसणाऱ्या विद्यार्थ्यांचे ज्यादा वर्ग घेऊन त्यांच्यात अभ्यासाची आवड निर्माण केली. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबर इतर कलागुणांना वाव मिळेल, अशी व्यवस्था केली. विद्यार्थ्यांना कधीही शिक्षा केली नाही. साने गुरुजींचं लोकप्रिय वचन आहे, *शिक्षा शरीराला नाही तर मनाला झाली पाहिजे.* त्याप्रमाणे आम्ही वागलो. मुलांच्या चांगल्या कलागुणांना प्रोत्साहन देत काम केलं. त्यामुळे आमच्या शाळेचा निकाल १०० टक्के लागतो.'

*राजारामशेठ विद्यालयात* विद्यार्थी आणि पालक यांच्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. ते असे-

- अशिक्षित पालकांसाठी *प्रौढ साक्षरता वर्ग*
- अल्पशिक्षित पालकांसाठी *इंग्रजी स्पीकिंगचे* वर्ग
- शाळा झोपडपट्टी व आदिवासी पाड्याच्या मध्यावर असल्याने पालकांना अधिक उत्पन्नाचं साधन मिळावं यासाठी शिलाई प्रशिक्षण वर्ग भरवतो.
- विद्यार्थ्यांसाठीही *इंग्लिश स्पीकिंगचे* वर्ग
- शालेय अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यास वर्गाचं मोफत आयोजन.
- इयत्ता दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ज्यादा वर्ग घेऊन त्यांचा जास्तीचा अभ्यास घेण्यात येतो.
- *स्कॉलरशिप* व इतर स्पर्धात्मक परीक्षेचे मोफत वर्ग.

रश्मी खानविलकर सांगतात, 'परिसरातला एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, हा आमच्या शाळेचा दंडक आहे. त्यासाठी दरवर्षी जानेवारी ते जून महिन्यात आमच्या शाळेचे सर्व शिक्षक आजूबाजूच्या परिसरात फिरतात. जे विद्यार्थी शाळेत जात नाहीत, त्यांचा शोध घेतात. मुलांचं आणि त्यांच्या पालकांचं प्रबोधन करून मुलांना शाळेत मोफत प्रवेश देतो. अनाथ विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च सेवाभावी संस्थांमार्फत करतो. प्रत्येक स्पर्धा परीक्षा तसंच खेळांत सहभागी होण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देतो. सर्व वयोगटांतल्या विद्यार्थिनींसाठी आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण वर्ग घेतो.'

या शाळेची परिसरातील *एकमेव मराठी शाळा* अशी ख्याती आहे. पूर्वी ही शाळा *पूर्व प्राथमिक* आणि *माध्यमिक* अशी होती. आता संस्थेचं कला, वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयही आहे. १,१८० विद्यार्थी शाळेत शिकतात. *एसएससी, स्कॉलरशिप, महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा,* राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय शिष्यवृत्ती परीक्षा यांचे शाळेचे दरवर्षीचे निकाल १०० टक्के लागतात. सर्व स्पर्धात्मक परीक्षेत विद्यार्थी उत्तीर्ण होतात. ७० टक्के विद्यार्थी मागासवर्गीय आणि ३० टक्के आर्थिक मागासवर्गीय गटातले आहेत. ४७ शिक्षक शाळेत शिकवतात.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगतीही बोलकी आहे. रश्मी सांगतात, 'पाड्यावरच्या ८ *बाय* ८च्या झोपडीत राहाणाऱ्या शीतल खंडागळे या विद्यार्थिनीने इयत्ता दहावीत ९४ टक्के गुण मिळवलेत. पदवीधर झालेली शीतल सध्या एका कंपनीत उच्च पदावर काम करतेय. महादेव पिंजारी हा नौदलात काम करतो. प्रशांत जाधव *बीएसएनएलमध्ये* आहे. शिवाजी पिंजारी पोलीस खात्याच्या सेवेत आहे. सायली स्वतःचं *ब्यूटिपार्लर* चालवते.'

आतापर्यंत *राजारामशेठ विद्यालयाला* • उपक्रमशील संस्था (२००१) • उल्लेखनीय शैक्षणिक कार्य (२००५) • महाराष्ट्र सन्मान (२००९) • राष्ट्रीय सद्भावना (२००९) • लोकमान्य टिळक (२०१०) • पंडित जवाहरलाल नेहरू समाजरत्न (२०१०) हे पुरस्कार मिळालेत.

रश्मी खानविलकर सांगतात, 'शाळेच्या प्रगतीचं श्रेय मी विद्यार्थी आणि शिक्षकांना देते. शाळेत माझ्या कारकीर्दीची सुरुवात *हिंदी* आणि *मराठी* विषयाची शिक्षिका म्हणून झाली होती. त्यामुळे मी प्रत्येक शिक्षकाला मुख्याध्यापक होण्याच्या दृष्टीने परिपूर्ण होण्यासाठी प्रोत्साहन देते.'

इच्छा असेल तर मार्ग सापडतो. त्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागतात. शिक्षणाने जसा माणूस घडतो, तसा समाजही घडतो. चांगला समाज घडवण्यासाठी शिक्षण घेतलं पाहिजे. शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे. हे जोतिबा आणि सावित्रीबाई फुले यांचे विचार प्रत्यक्ष आचरणात आणून रश्मी खानविलकर आदर्श विद्यार्थी-विद्यार्थिनी घडवत आहेत.

Scanned with CamScanner